स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणारी

सूझन बी. अँथनी



स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणारी

सूझन बी. अँथनी

लेखिका : डेबोरा हॉपकिन्स
चित्रे : एमी बेट्स



स्त्रियांच्या अधिकारासाठी लढणारी

सूझन बी. अँथनी

"अपयश येणे अशक्य आहे !"

-सूझन बी. अँथनी, १९०६



एक कष्टाळू मुलगी

सूझन बी. अँथनीचा जन्म १८२० साली झाला. त्या काळात अमेरिकेतल्या सर्व लोकांना आपापल्या इच्छेप्रमाणे जगण्याची आणि काम करण्याची मुभा नव्हती.

काहीजण गुलाम होते. त्यांना कोणतेही अधिकार नसायचे. स्त्रियांनादेखील फारसे अधिकार नव्हते. लग्न झालेल्या स्त्रीला एखाद्या जमिनीची मालकीण होता येत नसे. मुलींना कॉलेजात जाण्याची परवानगी नव्हती. कोणत्याही स्त्रीला मतदानाचा अधिकार नव्हता.

सूझनला अमेरिकेत बदल घडवून आणायचा होता. अमेरिकन स्त्रियांनाही पुरुषांप्रमाणेच मतदानाचा अधिकार असावा असे तिला वाटे. एलिझाबेथ कॅन्डी स्टँटन या आपल्या मैत्रिणीबरोबर सूझनने आयुष्यभर महिलांच्या अधिकारासाठी लढा दिला. मतदानाचा अधिकार मिळायला मात्र सूझनच्या अपेक्षेपेक्षा खूपच काळ लागला.

सूझन ब्रोनेल अँथनीचा जन्म मॅसेच्युसेट्स इथे झाला. तिचे वडील डॅनियल हे एक क्वेकर होते. म्हणजे कष्ट करून साधे आयुष्य जगण्यावर त्यांचा विश्वास होता.

सूझनच्या वडिलांची एक गिरणी होती. तिथे बायका कापसापासून कापड विणण्याचे काम करत. गिरणीतल्या तरुण मुलींपैकी अकरा मुली सूझनच्या मोठ्या कुटुंबाबरोबर राहत.

सूझन आणि तिच्या बहिणी एवढ्या सगळ्या लोकांचा स्वयंपाक करून आवराआवरी करायला आपल्या आईला मदत करत. पावाच्या वीस लाद्या भाजण्यात अख्खा दिवस जाई !

त्या काळी बरेच लोक मुलींना शिकवत नसत. सूझनच्या वडिलांना मात्र वाटत असे की, मुलींनी शिकले पाहिजे.

वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षी सूझन वाचायला शिकली पण खूप काळ कमी प्रकाशात वाचल्याने तिच्या डोळ्यांवर परिणाम झाला. कमी उजेडात वाचल्याने सूझनचा उजवा डोळा कायमचा तिरळा झाला.

तरीही सूझनला वाचायला भारी आवडे. कधीकधी ती शाळेत जात असे आणि एरवी तिला घरीच शिकवले जाई.



गिरणीत काम करणाऱ्या एका बाईला सर्व कामगारांची मुख्य करा अशी सूचना सूझनने वयाच्या अकराव्या वर्षी आपल्या वडिलांना केली. त्या बाईला तिच्या पुरुष मुख्यापेक्षा जास्त माहिती असल्याचे सूझनला सरळच दिसत होते.

सूझनच्या वडिलांनी मात्र तसे करायला नकार दिला. पुरुष आणि स्त्री समान आहेत असे जरी त्यांना वाटत असले तरीही त्यांना वहिवाट बदलायची नव्हती. त्या काळी कायम पुरुषच मुख्य असे.

सूझनचे आपल्या वडिलांवर प्रेम होते पण तिला त्यांचा हा निर्णय काही समजून घेता येईना.

एखादी स्त्री मुख्य का असू नये? जगात बदल घडवायला सुरुवात का करू नये?

लहानपणीच सूझनने असे कठीण प्रश्न विचारायला सुरुवात केली आणि तिने ते कधीच थांबवले नाही.

सूझन किशोरवयात असताना कठीण काळ आला. तिच्या वडिलांची गिरणी हातातून गेली आणि घरसुद्धा गेले.

घरखर्चात हातभार लागावा यासाठी सूझनने एका वसतिगृहाच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करायला सुरुवात केली. तिला घरच्यांची खूप आठवण येई.

मात्र लवकरच सूझनला स्वतंत्र राहण्याची सवय झाली. तिने उत्तम काम केले आणि ती मुख्याध्यापिका झाली. सूझनला काही मित्र होते पण तरीही शेवटी तिने लग्न न करण्याचा निर्णय घेतला. तिला स्वतःचे स्वातंत्र्य गमवायचे नव्हते.

दहा वर्षे शिक्षणक्षेत्रात काढल्यावर नवीन आव्हाने पेलण्यासाठी सूझन सज्ज झाली. अमेरिकेत सुधारणा घडवून आणण्यात आपण हातभार लावावा अशी सूझनची इच्छा होती. पण एक स्त्री काय करू शकणार होती?

"गुलामगिरी म्हणजे अगदी घृणास्पद....."

-सूझन बी. अँथनी, १८५४



बदल घडवण्यासाठी सूझनचे प्रयत्न

न्यूयॉर्कमधील रोचेस्टर येथे आपल्या कुटुंबाच्या नवीन शेतावर राहण्यासाठी सूझन परत गेली तेव्हा ती जवळजवळ तीस वर्षांची होती.

सुरुवातीला सूझन घरच्या शेतावरच्या कामात मदत करत असे. मात्र लवकरच ती तिच्यासारख्या इतर लोकांबरोबर वेळ घालवू लागली. त्यांनाही अमेरिकेत बदल घडवून आणायचे होते.

एखाद्या महत्त्वाच्या सभेसाठी म्हणून सूझन धावत जायची आणि त्या गडबडीत झाडांना पाणी घालायला हमखास विसरायची !

सूझनचे बरेच मित्रमैत्रिणी ‘अॅबोलिशनिस्ट’ होते. म्हणजे ते गुलामगिरीच्या विरोधात होते. त्यांना गुलामगिरीची प्रथा मोडून काढायची होती.

सूझन आणि तिचे कुटुंबीय ‘अंडरग्राउंड रेलरोड’ नावाच्या संघटनेचे सदस्य झाले. पळून आलेल्या गुलामांना उत्तरेकडे कॅनडाला पळून जाऊन स्वतंत्र व्हायला ही संघटना मदत करत असे. सूझनचं घर म्हणजे संघटनेच्या सदस्यांचा बैठकीचा अड्डा झाला.

१८५१ साली सूझन न्यूयॉर्कमधल्या सेनेका फॉल्स येथे गेली. तिथे एका रस्त्यात तिची एलिझाबेथ केडी स्टँटन ह्यांच्याशी भेट झाली.

मिसेस स्टँटनला भेटून सूझनला फारच हुरूप आला. स्त्रियांच्या हक्कासाठी करत असलेल्या कामाबद्दल मिसेस स्टँटन आधीपासूनच प्रसिद्ध होत्या.

मिसेस स्टँटननी ल्युक्रेशिया मॉटच्या सोबतीने १८४८ च्या जुलै महिन्यात स्त्रियांच्या अधिकारांविषयीची पहिली सभा आयोजित केली होती. सूझनला ते माहीत होते.

त्या सभेत मिसेस स्टँटननी अशी घोषणा केली की, स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीच्या आहेत. विवाहित स्त्रियांना मालमत्ता बाळगायचा अधिकार असला पाहिजे असे त्या म्हणाल्या. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांना मतदानाचा अधिकार असायला हवा असे मिसेस स्टँटनचे म्हणणे होते !

अमेरिकन स्त्रियांसाठी मतदानाच्या अधिकाराची मागणी करून एलिझाबेथ केडी स्टँटन मूर्खपणा करत आहेत असेच प्रत्येकाला वाटत होते. सूझन मात्र मिसेस स्टँटनशी सहमत होती. जोवर स्त्रियांना मतदानाचा, मालमत्ता बाळगण्याचा आणि संपूर्ण नागरिक होण्याचा अधिकार मिळत नाही तोवर त्यांना स्वतःच्या आयुष्यावर हक्क सांगता येणार नाही किंवा पुरुषांच्या बरोबरीने अधिकार मिळवता येणार नाहीत हे तिच्या लक्षात आले होते.



स्त्रियांच्या अधिकाराचा जाहीरनामा

सेनेका फॉल्स, न्यूयॉर्क, १९-२० जुलै १८४८

“कोणतीही अस्सल स्त्री आत्मभानाने जगणारी असेल..”

- सूझन बी. अँथनी, १८५७

सखी आणि लढवय्या

लवकरच सूझन आणि मिसेस स्टँटनची घनिष्ट मैत्री झाली आणि त्या दोघी स्त्रियांच्या अधिकारासाठी चाललेल्या चळवळीचे नेतृत्व करू लागल्या.

मिसेस स्टँटनला आपल्या लहान मुलांसाठी बऱ्याचदा घरी थांबावे लागे. तेव्हा कामाचा प्रचार करण्याचे काम सूझनकडे येई.

स्त्रियांच्या हक्काचा प्रचार करण्यासाठी सूझन सबंध न्यूयॉर्कभर फिरू लागली. सूझन बी. अँथनीला तिचे खरे काम सापडले होते.

सूझन पुष्कळ फिरू लागली. आगगाडीने किंवा मालगाडीबरोबर एकटीने प्रवास करू लागली. क्वचित हिमवादळांना तोंड देत बर्फाच्या उघड्या गाडीतून जाऊ लागली.

जाण्या-येण्याचा खर्च भरून निघावा म्हणून सूझन भाषण करण्याचे पंचवीस सेंट्स घेत असे. कधीकधी भाषण ऐकायला शेकडो माणसे येत तर कधीकधी अगदी कमी माणसे असत.

सूझन अगदी सोप्या शब्दात थेट आपले विचार मांडत असे. स्त्रियांना त्रासदायक ठरणारे कायदे बदलण्याची गरज ती ठामपणे सांगत असे. स्त्रियांनी स्वतःची बाजू मांडावी, स्वतंत्र आणि कणखर वृत्तीचे व्हावे असे आव्हान ती करत असे.

कोणत्याही स्त्रीने स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत, स्वतःचे असे एखादे काम करावे आणि स्वतःच्या पायांवर उभे राहावे असे सूझन सांगत असे. खुद्द सूझन बी. अँथनी अगदी हेच करत होती.



“आपल्याला सतत काम चालू ठेवले पाहिजे...”

-सूझन बी. अँथनी, १९०३



मतदानाचा अधिकार

स्त्रियांची बाजू मांडण्याबरोबरच सूझन अबोलिशनिस्ट लोकांबरोबर गुलामगिरी नष्ट करण्यासाठी काम करत होती.

अबोलिशनिस्ट लोकांचे एकच ध्येय होते : गुलामगिरीत असलेल्या माणसांना मुक्त करणे. सूझन आपल्या चळवळीतही सामील होत आहे हे बघून त्यांना आनंद वाटत होता. त्यांना मात्र स्त्रियांच्या अधिकारासाठी काम करण्यात मुळीच रस नव्हता.

१८६१ साली अमेरिकेत यादवी युद्धाला सुरुवात झाली. उत्तर आणि दक्षिण अमेरिकेत झालेल्या संघर्षाचा परिणाम म्हणजे हे युद्ध.

१८६५ साली यादवी युद्ध संपले. आता गोरे आणि काळे, पुरुष आणि स्त्रिया अशा सर्व अमेरिकन लोकांना मतदानाचा अधिकार मिळेल अशी सूझनला आशा वाटत होती.

१८६५ साली अमेरिकन सरकारने संविधानातील चौदावी दुरुस्ती संमत केली. त्यामुळे याआधी गुलाम असलेल्या लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला – पण फक्त पुरुषांना. गोऱ्या आणि काळ्या सर्वच स्त्रियांना आणखी वाट बघावी लागणार होती.

सूझन, मिसेस स्टँटन आणि स्वतः पूर्वी गुलाम असलेली सोजर्नर ट्रूथ यांच्यासह अनेक स्त्रिया संतापल्या आणि नाराज झाल्या. तरीही त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता. त्यांना लढत राहणे भाग होते.

सूझन आणि मिसेस स्टँटनने एकामागून एका राज्यांचे दौरे केले आणि स्त्रियांच्या मताधिकाराबद्दल जनजागृती केली. त्यांनी 'नॅशनल वूमन सफ्रेज असोसिएशन'ची स्थापनाही केली.

कायद्यात आणि लोकांच्या विचारसरणीत बदल घडवून आणणे हे कठीण काम होते. अमेरिकेत बदल घडवून आणण्याचा सर्वात उत्तम मार्ग कोणता यावर समान अधिकारांविषयी सर्वाधिक आस्था असणाऱ्या स्त्रियांचेदेखील एकमत होत नसे. सूझनने मात्र आशा सोडली नाही.

“माझ्या नैसर्गिक अधिकारांकडे, माझ्या नागरी अधिकारांकडे .....दोन्ही बाबींकडे दुर्लक्ष केले जात आहे.”

-सूझन बी. अँथनी, १८७३

अपयश अशक्य आहे !

१८७२ साली सूझनने अमेरिकेच्या कायद्यांची कसोटी पाहिली. निवडणुकीच्या दिवशी ती आणि देशभरातल्या शेकडो स्त्रिया आपले मत द्यायला गेल्या.

“मी तिकडे मतदान केंद्रावर जाऊन माझे मत देऊन आले !” तिने आपल्या प्रिय मैत्रिणीला मिसेस स्टँटनला पत्रात लिहिले.

अपेक्षेप्रमाणे सूझनला अटक झाली. तिला तुरुंगात ठेवले नाही पण तिच्यावर खटला दाखल करण्यात आला. न्यायाधीशांनी तिला दोषी ठरवले. तुला काही बोलायचे आहे का असे त्यांनी सूझनला विचारले तेव्हा ताडकन उभी राहून तिने एक धाडसी भाषण ठोकले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही.

४ जुलै १८७६ साली अमेरिकेला शंभर वर्षे पूर्ण झाली. तेव्हा फिलाडेल्फियाच्या एका समारंभात स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचून दाखवण्यात आला. त्यानंतर सूझनने त्यांच्या हातात आणखी एक जाहीरनामा दिला. तो बघून सगळे आश्चर्यचकित झाले. तो होता – स्त्रियांच्या अधिकारांचा जाहीरनामा.

सूझन आणि इतर स्त्रियांनी मिळून आपली लढाई काँग्रेसपर्यंत नेली. १८८७ सालच्या सुरुवातीला स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून अमेरिकन राज्यघटनेत बदल करण्याचा विचार काँग्रेसने केला. त्यानंतर कितीतरी वर्षे उलटली पण त्या बदलाला काँग्रेस नकारच देत राहिली.

१९०६ सालच्या फेब्रुवारी महिन्यात सूझन बी. अँथनी शहाऐंशी वर्षांची झाली. काही वर्षांपूर्वीच तिच्या प्रिय मैत्रिणीचे मिसेस स्टँटनचे निधन झाले होते. सूझनने आपल्या आयुष्यातल्या शेवटच्या सभेला हजेरी लावली आणि स्त्री हक्क चळवळीकरता निधी जमा करायला मदत केली.

सूझनच्या शेवटच्या भाषणाची वेळ आली तेव्हा प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात ती कशीबशी उठून उभी राहिली. खणखणीत आवाजात तिने स्त्रियांना हताश न होण्याचे आव्हान केले. “अपयश येणे अशक्य आहे !” ती ओरडली.

त्यानंतर काहीच आठवड्यात सूझन बी. अँथनी मरण पावली. त्यानंतर आणखी चौदा वर्षांनी म्हणजे १९२० साली अमेरिकन स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

समाप्त